# साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

ISSN 2278-3954 Saptahik Nagara


श्री. ______________________

पत्ता ______________________

______________________

वरील पत्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)


**NAGARA WEEKLY** ✻ मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०१९





विख्यात हिंदी कवी हरिवंशराय बच्चन यांचा दि. २७ नोव्हेंबरला जन्मदिन.

विनम्र अभिवादन !



# मेंढीछाप

।। मुक्तक ।।
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

मी लहानपणी खूप बुजरा होतो. तसा घाबरटही होतो. वडील अकाली गेलेले. आई मजुरी करणारी. यामुळे माझी नि आमच्या कुटुंबाची समाजातील पत कमी होती. ती अनेकदा स्पष्टपणे जाणवत असे. आमच्या लहानपणी गावात बलुतेदारी काही प्रमाणात अस्तित्वात होती. न्हाव्याला रोख पैसे देण्याची प्रथा नव्हती. वर्षाकाठी धान्य दिले जाई. कुटुंबातील दाढी-कटिंग करावी लागणाऱ्या डोक्यांवर औतांची संख्या आणि धान्याचे देण्याचे प्रमाण ठरविले जात असे. आमच्या घरातून मीच एकटा केस कापण्यासाठी जात असे. त्या मोबदल्यात वर्षाकाठी एका औताची म्हणजे चार पायली बाजरी न्हाव्याला दिली जाई. चार पायली म्हणजे साधारण तीस किलोग्रॅम.



आमचा न्हावी रावळ मामा मोठा हुषार. रुबाबदार माणूस. उंची बेताची पण भरदार अन बुक्कीबन गडी. दणकट नि वजनदार माणूस. त्याच्या डोळ्यातील धाक पाहूनच मी टरकत असे. त्याच्या बोलण्यातील जरबेला गावातील भली माणसेही दाद देत. दररोज सकाळी दावल मामाकडे केस कापण्यासाठी रांग असे. त्यात पोराटोरांची वेगळी अन् मोठ्या आणि प्रतिष्ठितांची वेगळी असे. प्रतिष्ठितांना तिष्ठत बसायची पाळी येत नसे. त्यांचा नंबर लवकर लागे. त्यांची कटींग हवी तशी कौतुकासह होत असे.

लहानांचा त्यातल्या त्यात माझा नंबर हमखास उशीरा लागे. माझा नंबर लवकर येऊ नये असे मला सारखे वाटे. त्याला कारण होते. केस कापायला सरुवात केल्यानंतर रावळमामा मान अशी काही दाबायचा की कोणी राक्षस मानगुटीवर बसल्यासारखे वाटे! मान इकडून तिकडे झटक्यात फिरविणे.. खेचणे.. कान धरुन ओढणे.. असे सारे असह्य होई! केस कमी करण्यासाठी मशीन वापरताना त्याचा आवाज डोक्यावर रणगाडा चालल्यासारखा होई. त्याने काही केस कापले तर काही थेट उपटले जात. वस्तऱ्याची धार अशी की रक्त आले नाही, असा प्रसंग विरळाच!

केस कापण्यासाठी जमिनीवर पोते टाकून त्यावर आम्हाला बसवले जाई. माझी चुळबुळ जरा अधिक असेल की काय कोणास ठाऊक..? पण रावळमामा माझे डोके विलक्षण पद्धतीने जमिनीवर दाबून केस कापत असे. बरं हे सारे सहन करुनही इतर मुलांसारखे माझी कटींग होत नसे. कशीतरी आटोपलेली असे. दरवर्षाचे धान्य वेळेवर न पोचणे नि माझ्यामागे पुरुष पालक नसणे.. हे मुख्य कारण मला येथे जाणवत असे. पारजेपण आणि सापत्नभाव या एकाच नाण्याच्मा दोन बाजू असतात, हे तेव्हा कळत नकळतपणे सिद्ध होत असे.

यामुळे मी रावळ मामांकडे जाण्याचा कंटाळा करीत असे. बरं कंटाळा केला आणि काही दिवस असेच गेले तर त्याचा परिणाम लगेच दृश्य रुपात जाणवत असे. डोक्यावरचे केस अस्ताव्यस्त वाढत असत. आई वारंवार जायला सांगे. पण रावळमामाची भीती.. त्यांच्या हत्यारांचा धाक.. नको ते केस कापणे अशीच माझी भावना व्हायची. पुढे रावळमामाही कंटाळा करायचा. तुमचे धान्य आले नाही असे वारंवार सांगायचा. मग मी त्याच्याकडे जाणे टाळायचो. पण डोक्यावरचे केस वाढणे काही थांबत नसे. त्यामुळे माझे डोके, चेहरा आणि एकूणच अवतार दिवसेंदिवस विचित्र दिसत असे. ते पाहून आई खूप रागवायची. बोलायची. मी वेगवेगळी कारणे सांगून वेळ मारुन न्यायचो.

दुसरीत असताना एकदा असेच केस खूप वाढले. अस्ताव्यस्त झाले. अतिशय खराब दिसू लागले. इतके खराब की पाहणाऱ्यालाही लाज वाटायची. आमच्या शेजारी हिरकणकाकू राहायच्या. त्या शिवणकाम करामच्या. आईने मला एक दिवस पकडले. खेचूनच त्यांच्यासमोर बसवले. हिरकण काकूने माझे केस कापायला सुरुवात केली. काही कापून झाल्यावर माझे डोके विचित्र दिसू लागले. केसांत पायऱ्या पायऱ्या दिसू लागल्या. कपडे कापण्याइतके केस कापणे सोपं नाही, हे हिरकणकाकूला कळले. पण काय करणार..? काकू दुरुस्त करायचा प्रयत्न करायची.. जो जो ती दुरुस्त करायचा प्रयत्न करायची तो तो कापलेले केस विचित्र व्हायचे! शेवटी तिने नाद सोडला. मी आरशात पाहिले. पाहण्यासारखे काही नव्हते. एकदम विचित्र..! पुढचे चार-सहा महिने माझे सवंगडी माझे नाव विसरले होते.. सारेच म्हणायचे, 'एऽऽ..मेंढीछाप!'

■■■




